# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्प) अधिवेशन, २०२२

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### राज्यातील हुशार व प्रज्ञावान विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर शिष्यवृत्ती देण्याबाबत

**(१) ७९० (१८-०३-२०२०) डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील हुशार व प्रज्ञावान विद्यार्थ्यांना प्रोत्साहान मिळावे व त्यांना पुढील शिक्षणाकरीता आर्थिक सहाय्य व्हावे याकरीता राज्य शासनाने प्रोत्साहनपर शिष्यवृत्ती देण्याची व्यवस्था सुरु केली असून शिष्यवृत्ती परिक्षेकडे राज्यातील विद्यार्थ्यांनी नकार दिल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२३-०२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील माध्यमिक शाळेमधील विद्यार्थ्यांसाठी एन.टी.एस.व एन.एम.एम.एस. शिष्यवृत्तीबाबत

**(२) ९५२ (१८-०३-२०२०) श्री.किशोर दराडे, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील माध्यमिक शाळेमधील विद्यार्थ्यांसाठी एन.टी.एस. व एन.एम.एम.एस. शिष्यवृत्ती घेण्यात येते, त्याद्वारे निवड विद्यार्थी यांना केंद्र /राज्य शासनमार्फत शिष्यवृत्ती अदा करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील शिष्यवृत्तीसाठी निवड होणाऱ्या विद्यार्थी संख्येत घट होत असल्याने शाळास्तरावर विद्यार्थी शिष्यवृत्ती संख्येत वाढ होण्यासाठी शासनाकडून काही उपाययोजना प्रस्तावित आहे काय व त्याचे स्वरूप काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील काही जिल्ह्यांनी याबाबत उल्लेखनीय कामकाज केले असल्यास त्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०४-०३-२०२१) :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील सर्व जिल्ह्यात कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरु करण्याबाबत

**(३) ३१२७ (०२-०६-२०२०) श्री.नागोराव गाणार, डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, सातारा यांचे जन्मगाव असलेल्या नायगाव (ता.खंडाळा) येथे पुणे विद्यापीठाशी करार करुन कौशल्य प्रशिक्षण केंद्र उभारण्यात येणार असल्याचे माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या माध्यमातून सातारा जिल्ह्यातील युवतींना उद्योजकतेचे धडे, स्पर्धा परिक्षेचा अभ्यास करता येणार असल्याने सदर कौशल्य प्रशिक्षण केंद्र राज्यातील सर्व जिल्ह्यात सुरु करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सर्व जिल्ह्यात कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नवाब मलिक (२३-०२-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत समन्वय करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही

सद्य:स्थितीत या विभागामार्फत प्रत्येक जिल्ह्यात व तालुक्यात महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्थेमार्फत कौशल्य प्रशिक्षण केंद्रे तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू आहेत. त्या व्यतिरिक्त प्रधानमंत्री कौशल्य विकास केंद्र सुरु आहेत. तसेच जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता कार्यालयात समुपदेशन केले जाते. या व्यतिरिक्त ग्रामविकास विभागातर्फे पंडित दिन दयाल उपाध्याय कौशल्य विकास केंद्र सुरु आहे. तसेच आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय विभाग, अल्पसंख्यांक विभाग, नगरविकास विभाग, उद्योग विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांचे मार्फत देखील कौशल्य प्रशिक्षण व उद्योजकतेचे धडे दिले जातात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बोईसर (जि.पालघर) येथे बेकायदेशीररित्या तांदळाचा साठा केल्याबाबत

**(४) ३२२० (०२-०६-२०२०) श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोईसर (जि.पालघर) येथे बेकायदेशीररित्या तांदळाचा साठा केल्याचे माहे एप्रिल-मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (३१-०७-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, बोईसर (जि.पालघर) येथे बेकायदेशीररित्या जमा केलेला तांदळाचा साठा जप्त करण्यात आला असून, त्यासंदर्भात दोषी आढळून आलेले मे.भावेश व्हि. देसाई व श्री.अश्रफ कासम मेमन यांच्याविरुध्द जीवनावश्यक वस्तु अधिनियम १९५५ चे कलम ३ व ७, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ चे कलम ५१(ब) व भा.द.स. १८६० चे कलम १८८ अन्वये गुन्हा क्र.।। ०१०६/२०२०, दिनांक ०६/०४/२०२० रोजी बोईसर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना वैद्यकीय प्रतिपूर्ती कॅशलेसच्या स्वरूपात देणेबाबत

**(५) ३२९४ (०२-०६-२०२०) श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.किशोर दराडे, डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विलास पोतनीस, श्री.कपिल पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सावित्रीबाई फुले-फातिमा शेख कॅशलेस कुटुंब आरोग्य योजना लागू करण्याबाबत शिक्षक भारती संघटनेनी मागणी केली असून त्यानुषंगाने राज्यातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना देण्यात येणारी वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना ही कॅशलेसच्या स्वरूपात देण्याबाबत सर्व प्रकारची माहिती शासनाने शाळांकडून घेतली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कॅशलेश प्रतिपूर्ती योजना शिक्षकांना तात्काळ लागू करण्याबाबत मा.शालेय शिक्षण मंत्री महोदयांनी सभागृहात आश्वासित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कॅशलेश वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना लागू करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप काय आहे, उक्त प्रस्तावाच्या मान्यतेबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२२-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) कॅशलेस सुविधेच्या अनुषंगाने सादर केलेल्या प्रस्तावास सार्वजनिक आरोग्य विभाग, नियोजन विभाग व वित्त विभागाने असहमती दर्शवली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## राज्यातील शिक्षक-कर्मचार्‍यांच्या पाल्यांना शैक्षणिक शुल्काची प्रतिपुर्ती मिळणेबाबत

**(६) ४८७९ (१३-१२-२०२०) श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षक-कर्मचार्‍यांच्या पाल्यांना मोफत शिक्षण योजनेंतर्गत दिल्या जाणाऱ्या व्यवसायिक अभ्यासक्रमाची शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्ती शिक्षण शुल्क समितीच्या मान्य शुल्कानुसार दिली जात नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षण शुल्क समितीने निश्चित केलेल्या शुल्काप्रमाणे शुल्क देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२३-०२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) राज्यातील अनुदानित अशासकीय माध्यमिक शाळांतील तसेच, उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना शासन निर्णय, दिनांक १९ ऑगस्ट, १९९५ अन्वये योजना लागू असून त्यामध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमाबाबत ही सवलत प्रमाणित फी पुरतीच अनुज्ञेय आहे. त्याप्रमाणे पात्र विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य देण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे-मुंबई दरम्यानच्या हायपरलूप प्रकल्पाबाबत

**(७) ६००९ (१४-१२-२०२०) डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे-मुंबई दरम्यानच्या अति वेगवान प्रवासासाठीचा सुमारे ७० हजार कोटी रुपये खर्चाचा हायपरलूप प्रकल्प पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत स्वीस चॅलेंज पध्दतीने सार्वजनिक खाजगी तत्वावर राबविण्याचा निर्णय घेण्यात आलेला असून प्रकल्पासंदर्भात आर्थिक व इतर दायित्वे, जमीन संपादन, सवलती, जोखीम विश्लेषण व नियोजन यानुषंगाने महाराष्ट्र पायाभूत सुविधा विकास सक्षम प्राधिकरणाच्या (महाआयडीया) स्तरावर सुरु करण्यात आलेली छाननी प्रक्रिया पूर्ण झाली आहे काय,
(२) असल्यास, सदर छाननीत कोण-कोणत्या बाबी स्पष्ट झालेल्या आहेत, छाननीनुसार आता उक्त प्रकल्पासाठी प्रत्यक्षात किती निधीची आवश्यकता असून उक्त निधी कशाप्रकारे उपलब्ध करण्यात येणार आहे, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०७-०१-२०२२) :** (१) नाही.

सदर प्रकल्प स्वीस चालेंज पध्दतीने महाराष्ट्र पायाभूत विकास सक्षम प्राधिकरण कायदा २०१८ मधील तरतुदीनुसार राबविण्यात येत आहे. दिनांक ३० जुलै, २०१९ रोजी मा.मंत्रिमंडळाने पुणे मुंबई हायपरलूप प्रकल्पास

"पायाभूत सुविधा प्रकल्प" (Infrastructure Project) म्हणुन तसेच अर्जदार मे.डीपी वर्ल्ड एफझेई व हायपरलूप टेक्नॉलॉजीज आयएनसी संस्थेस मूळ प्रकल्प सूचक (Original Project Proponent) म्हणून, महाराष्ट्र पायाभूत विकास सक्षम प्राधिकरण नियम, २०१८ मधील नियम ५(१-अ) नुसार हमीपत्र देण्याच्या अटीवर मान्यता मिळाली आहे. सदर हमीपत्र दिनांक २८/०१/२०२० रोजी मूळ प्रकल्प सूचकाने सादर केले आहे. परंतु हमीपत्रात सुधारणा करण्याचे निर्देश शासनाव्दारे मूळ प्रकल्प सूचकास देण्यात आले होते. त्यानुसार त्यांचेकडुन स्पष्टीकरणात्मक पत्र शासनास प्राप्त झाले असून महाआयडीच्या बैठकीत याबाबत निर्णय घेण्याचे प्रस्तावित आहे.

(२) सदर प्रकल्पासाठी मूळ प्रकल्प सूचकाने अंदाजित केलेनुसार रुपये ७०,०००/- कोटी इतका खर्च आहे. प्रकल्प भू-संपादन अथवा इतर बाबींचा कुठलाही आर्थिक भार राज्य शासनावर येणार नाही या अटीवर दिनांक ३०/०७/२०१९ रोजी मंत्रिमंडळाने पुणे मुंबई हायपरलूप प्रकल्पास "पायाभूत सुविधा प्रकल्प" (Infrastructure Project) म्हणुन तसेच अर्जदार 'डीपी वर्ल्ड एफझेई व हायपरलूप टेक्नॉलॉजीज आयएनसी' संस्थेस सूचक (Original Project Proponent) म्हणून घोषित करण्यास मान्यता दिली आहे.

(३) लागू नाही.

---

## नवी मुंबईतील गावठाणांचे सीमांकन करुन भुमीपूत्रांची घरे अधिकृत करण्याबाबत

**(८) ८०१३ (२०-०४-२०२१) डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी** : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील गावठाणांचे सीमांकन करुन भुमीपूत्रांनी गरजेपोटी बांधलेली घरे अधिकृत करुन आणि गावठाणांच्या विकासासाठी ४ एफएसआय देऊ असे शासनाने आश्वासन दिले असल्याचे दिनांक १८ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आश्वासनानुसार नवी मुंबईतील गावठाणांचे सीमांकन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२४-१२-२०२१) :** (१) व (२) नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी केलेल्या बांधकामांच्या अनुषंगाने धारण केलेल्या क्षेत्राचे सर्वेक्षण जिल्हाधिकारी यांच्या मदतीने करणेबाबत सिडको महामंडळास दिनांक १६/०३/२०१७ च्या पत्रान्वये निर्देश देण्यात आले आहेत. घरे अधिकृत करणे अथवा FSI चा निर्णय सर्वेक्षणानंतर घेण्यात येईल.

सद्य:स्थितीत, जिल्हाधिकारी, ठाणे व रायगड यांचेमार्फत सर्वेक्षणाची कार्यवाही सुरु असून काही ठिकाणी गावठाणांचे सिमांकन करण्यास स्थानिकांनी विरोध/ हरकत केल्याच्या घटना घडलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## आकुर्ली (ता.बोरिवली, जि.मुंबई उपनगर) येथील आरक्षित भूखंडाचा व्यवसायिक वापर केल्याबाबत

**(९) ८४४३ (१८-०६-२०२१) श्री.प्रविण दरेकर, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, श्री.महादेव जानकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आकुर्ली (ता.बोरिवली, जि.मुंबई उपनगर) येथील सिटी सर्व्हे क्र.१७१/१८, १७१/१९, १७१/२० व १७१/२१ यावर सन २००० मध्ये मुंबई गोरक्षण मंडळ, सेकंडरी स्कुल, प्ले ग्राऊंड व खाजगी शाळा असे आरक्षण होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आरक्षणाची नोंद न घेता वा आरक्षण रद्द करण्याची कार्यवाही न करता या भूखंडांवर टोलेजंग इमारती उभारण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आरक्षित भूखंडाचा व्यवसायिक वापर केल्याप्रकरणी संबंधित दोषींवर कारवाई करुन भूखंड शासनाचे ताब्यात घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०३-०१-२०२२) :** (१) होय.

बृहन्मुंबई विकास योजना-१९९१ नुसार आकुर्ली, ता.बोरीवली येथील सिटी सर्व्हे क्र. १७१/१८, १७१/२० व १७१/२१ हे भूखंड अनुक्रमे खेळाचे मैदान (Playground), माध्यमिक शाळा (Secondary School) व शाळा अशा प्रयोजनार्थ आरक्षित होते.

(२) नाही, अशी बाब नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या तत्कालीन विकास नियंत्रण नियमावली-१९९१ मधील तरतुदीनुसार महापालिकेच्या विकास नियोजन विभागातर्फे सदर आरक्षणाचे स्थानांतरण (Relocation) नियमामधील तरतूदींचा अवलंब करून जमिनमालकाच्याच अभिन्यासामध्ये इतर ठिकाणी म्हणजेच न.भु.क्र.१७१/१A/६१, १७१/१A/६२, १७१/१A/४५, १७१/B/१ या जागेवर करण्यात आले असून त्यानुसार सुधारीत अभिन्यासास महापालिकेने दिनांक १३/०६/१९९६ रोजी मंजूरी दिली आहे व सदर आरक्षण स्थानांतरणानुसार आरक्षण मुक्त झालेल्या न.भु.क्र. १७१/१८, १७१/२०, १७१/२१ या जागेवर इमारतींना मंजूरी दिली आहे. सदर सुधारित अभिन्यासामध्ये स्थानांतरणाद्वारे आरक्षित करण्यात आलेला भुखंड महापालिकेस हस्तांतर करणेबाबतची अट महापालिकेने जमीन मालकास बंधनकारक केली आहे.

(३) लागू होत नाही.

वरील (२) प्रमाणे चौकशीची आवश्यकता नाही.

(४) लागू होत नाही.

---

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे साहित्य प्रकाशित करण्याबाबत

**(१०) ८५६५ (२०-०७-२०२१) डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा अप्रकाशित असलेला साहित्याचा अमुल्य ठेवा ग्रंथरुपाने लोकांसमोर येण्यासाठी शासनाने माहे एप्रिल, १९७९ मध्ये वा त्यादरम्यान स्थापना केलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीची वेळोवेळी पुनर्रचना करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अप्रकाशित साहित्याचे सुमारे २१-२२ खंड प्रकाशित करण्यात आले असून मागील काही वर्षात या कामात खंड पडला असून प्रकाशनाच्या कामास गती देण्यात आली नसल्याने सध्या २५ ते ३० खंड प्रकाशित होतील इतके त्यांचे अप्रकाशित साहित्य असून या प्रकाशनाच्या कामास प्राधान्य देण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनस्तरावरुन आढावा घेण्यात आला आहे काय, त्यात काय आढळून आले तद्नुसार अप्रकाशित साहित्य प्रकाशित करण्यासाठी निधीच्या उपलब्धतेसह शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच, सदरचे अप्रकाशित साहित्य साधारणत: किती कालावधीत किती खंडात प्रकाशित होणे अपेक्षित आहे ?

**श्री.उदय सामंत (०३-०१-२०२२) :** (१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीची स्थापना दिनांक १५ मार्च, १९७६ रोजी झाली असून सदर समितीची पुनर्रचना वेळोवेळी करण्यात आली आहे.

(२) समितीतर्फे आतापर्यंत २२ खंड ३ सोअर्स मटेरियल आणि २ पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले आहे. तसेच, २३ व्या खंडाचे काम सुरू आहे. काही खंडांच्या पुनर्मुद्रणाचे काम देखिल समितीतर्फे सुरु आहे. “जनता” साप्ताहिकाचे १९३०-१९५६ पर्यंतचे अंक उपलब्ध असून त्या अंकाचे अंदाजे २५ खंड होतील. त्यापैकी एका खंडाचे प्रकाशन झाले असून उर्वरित काम सुरु आहे.

(३) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे प्रकाशित आणि अप्रकाशित साहित्य प्रकाशित करण्यासाठी शासनाकडून दरवर्षी निधी उपलब्ध होत असतो. साहित्य प्रकाशित करण्यासाठी निधीची कमतरता नाही. जनताचे २५ खंड प्रकाशित होण्यासाठी साधारणत: तीन वर्षे लागतील.

---

## राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वैद्यकीय प्रतिपूर्ती कॅशलेसच्या स्वरूपात देण्याबाबत

**(११) ९२४२ (१५-०६-२०२१) डॉ.रणजित पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.किरण सरनाईक, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रवीण दटके, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ६३९४ ला दिनांक ४ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सावित्रीबाई फुले कॅशलेस कुटुंब आरोग्य योजना लागू करण्याबाबत शिक्षक भारती संघटनेने मागणी केली असून त्यानुषंगाने राज्यातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना कॅशलेसच्या स्वरूपात देण्याबाबत सर्व प्रकारची माहिती शासनाने शाळांकडून घेतली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना व त्यांच्या कुटुंबियांना (वैद्यकीय प्रतिपुर्ती) कॅशलेस आरोग्य योजना लागू करण्याबाबतचा प्रस्ताव सार्वजनिक आरोग्य विभाग, वित्त विभाग व नियोजन विभागास सादर करण्यात आला असून सदरहू प्रस्तावाची तपासणी करुन तात्काळ अंमलबजावणी करण्याबाबत कोणती उपाययोजना करण्यात आली आहे,

(३) असल्यास, कॅशलेस प्रतिपूर्ती योजना शिक्षकांना तात्काळ लागू करण्याबाबत मा.शालेय शिक्षण मंत्री महोदयांनी सभागृहात आश्वासित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदरहू शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कॅशलेस वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना लागू करण्याबाबत

कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप काय आहे तसेच सदरहू प्रस्तावास मान्यतेबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२२-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) कॅशलेस आरोग्य योजना शिक्षकांना तात्काळ लागू करण्याबाबत तत्कालिन मा.मंत्री शालेय शिक्षण यांनी विधानमंडळासमोर आश्वासित केले होते. तथापि, त्याअनुषंगाने सादर केलेल्या प्रस्तावास सार्वजनिक आरोग्य विभाग, नियोजन विभाग व वित्त विभागाने असहमती दर्शवली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील वातावरणातील प्रदूषण कमी करुन पर्यावरणाचे संवर्धन करण्याबाबत

**(१२) ९३२६ (२०-०७-२०२१) श्री.अभिजित वंजारी, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वातावरणातील प्रदूषण कमी करुन पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठी जागतिक निर्देशानुसार महाराष्ट्रातील नागपूरसह पाच प्रमुख शहरांचा समावेश करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी कोणते वेगवेगळे उपक्रम हाती घेण्यात आले, तसेच जनजागृती मोहिम सुरु केली आहे काय, त्याचा तपशील काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे (१५-०२-२०२२) :** (१) हे खरे आहे.
पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार, हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी राज्यातील नागपुर, औरंगाबाद, बृहन्मुंबई, नाशिक, पुणे आणि वसई-विरार या शहरांचा / नागरी समुहांचा "दशलक्षी शहरे" (Million Plus Cities / Urban Agglomerations) म्हणून समावेश करण्यात आला आहे.
(२) व (३) हवा प्रदूषण नियंत्रणाकरीता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने नीरी, नागपूर व आय.आय.टी., मुंबई व संबंधित शहरातील भागधारकांसोबत सर्व समावेशक कृती आराखडा तयार केला असून, सदर आराखड्यास केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने मान्यता दिली आहे. त्यानुषंगाने राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रमांतर्गत जनजागृतीसाठी वृत्तपत्रे, चित्रफलक इत्यादी द्वारे प्रसिद्धी तसेच रेडिओ सारख्या माध्यमामधून ध्वनीफीत संदेश प्रसारित करणे, तज्ञ लोकांचे परिसंवाद आयोजित करणे, शाळा, महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा आयोजित करणे इत्यादी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात ई-सिगारेट व हुक्का पार्लर बंद करण्याबाबत

**(१३) ९३४९ (१३-०७-२०२१) डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात ई-सिगारेटच्या वापरामुळे तरुणपिढीचे जीवन धोक्यात आले असून या ई-सिगारेट व हुक्का पार्लर वर बंदी आणण्याबाबत शासनाने कारवाई आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यात ई-सिगारेट व हुक्का पार्लर बंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे (२९-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.

अन्न व औषध प्रशासनाने दिनांक ०५/०३/२०१९ च्या पत्रान्वये औषध नियंत्रक (भारत सरकार) नवी दिल्ली यांनी मान्यता न दिलेल्या Electronic

Nicotine Delivery System (ENDS) व तत्सम पाठाचे उत्पादन, विक्री वितरणासंदर्भात कारवाई करण्याचे निर्देश दिले होते.
(२) अन्न व औषध प्रशासनाच्या बृहन्मुंबई विभागातील औषध निरीक्षकांनी माहे जुन-२०१९ च्या दरम्यान ई-सिगारेटचा साठा बांद्रा(पश्चिम), मुंबई येथे एका ठिकाणी जप्त व अंधेरी (पुर्व) व सांताक्रुझ(पुर्व) या दोन ठिकाणी प्रतिबंधित केला होता. त्याबाबत संबंधितानी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र. ३६९०/२०१९ व ३८७३/२०१९ दाखल केल्या. सदर याचिकेवर मा.उच्च न्यायालय यांनी दिनांक ०२/०८/२०१९ रोजी अंतरिम निकाल दिला. त्यानुसार मा.उच्च न्यायालयाने, औषध निरीक्षक यांनी जप्त व प्रतिबंधित केलेला ई-सिगारेटचा साठा मुक्त करण्याचे निर्देश दिले तसेच अशा प्रकारची कारवाई न घेण्याचे सुध्दा मा.उच्च न्यायालयाने निर्देश दिले.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील रेमडेसिवीर इंजेक्शनचा काळाबाजार रोखण्याबाबत

**(१४) ९५५४ (२३-०७-२०२१) श्री.रमेश कराड, श्री.प्रविण दरेकर, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, श्री.महादेव जानकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.विनायकराव मेटे, श्री.रामराव पाटील, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोविड-१९ विषाणू संसर्ग झालेल्या रुग्णांसाठी संजीवनी समजल्या जाणाऱ्या रेमडेसिवीर इंजेक्शन, टॉसिलिझ्युम्ब औषधांचा व मास्कचा मोठ्या प्रमाणावर काळाबाजार होत असल्याचे माहे जुलै, २०२० ते माहे मार्च, एप्रिल व मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले तसेच अन्न व औषध प्रशासन मंत्री यांच्या बुलढाणा जिल्ह्यात सुध्दा रेमडेसिवीर इंजेक्शनचा त्याचदरम्यान काळाबाजार होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही महिन्यांपुर्वी लोकप्रतिनिधींनी दिनांक ९ ऑक्टोबर, २०२० रोजी रेमडेसिवीर इंजेक्शनचा काळाबाजार होत असल्याबाबतची कल्पना एका पत्राद्वारे मा.मुख्यमंत्री महोदयांना देऊन चौकशी करण्याची विनंती केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आतापर्यंत किती व्यावसायिक, एजंट व अन्य व्यक्तींविरुध्द कारवाई करण्यात आली, किती रकमेचा माल जप्त करण्यात आला, तसेच केंद्र शासनाने माहे एप्रिल, २०२१ अखेरपर्यंत महाराष्ट्राला किती इंजेक्शन्सची उपलब्धता करून दिली व राज्य शासनाने रेमडेसिवीर इंजेक्शनचे वाटप जिल्हानिहाय केले असून जालना व काही विशिष्ट जिल्ह्यांना अधिक वाटा देण्यात आला, तसेच राज्य शासनाने किती इंजेक्शन उपलब्ध केले,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार रेमडेसिवीर इंजेक्शनचा काळाबाजार रोखण्याकरीता संबंधित दोषींविरुध्द कारवाई तसेच इंजेक्शनची उपलब्धता होण्याकरीता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे (२१-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

राज्यात रेमडेसिवीरचा काळाबाजार सुरु असल्याचा उल्लेख करून, गरिब रुग्णांना खाजगी व सरकारी रुग्णालयात रेमडेसिवीर इंजेक्शन मोफत उपलब्ध करून देण्याबाबत दिनांक ०२ ऑक्टोबर २०२० च्या पत्रान्वये मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांनी मा.मुख्यमंत्री यांना विनंती केली होती.

(३) सदर औषधांची अवैधरित्या विक्री होऊ नये म्हणून प्रशासनाने नियंत्रण ठेवून प्रकरणांचा शोध घेऊन पुढीलप्रमाणे कारवाई केली आहे.

१. एकूण धाडी - ६४
२. एकूण प्रथम खबर अहवाल - ६४
३. एकूण व्यक्तींना अटक - १८९
४. जप्त मालाची किंमत - रुपये ६,६१,८०८४

केंद्र सरकारच्या दिनांक २१/०४/२०२१ व दिनांक २४/०४/२०२१ रोजीच्या पत्रांद्वारे एकूण ४,३५००० इंजेक्शनचा साठा राज्यासाठी उपलब्ध करून दिला. तो प्रत्येक जिल्ह्यातील रुग्णसंख्येच्या प्रमाणात जिल्हाधिकारी यांचे नियंत्रणाखाली रुग्णालयांना वितरीत करण्यात आला असल्याने कोणत्याही जिल्ह्याला अधिक वाटा देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) संबंधितांची चौकशी करून कारवाई घेण्यात येत आहे. या औषधांची गैरमार्गाने विक्री होऊ नये म्हणून रुग्णसंख्येच्या प्रमाणात जिल्ह्यात वितरण करून जिल्ह्यांमध्ये जिल्हाधिकारी यांचे नियंत्रणाखाली रुग्णालयांना वितरीत करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील वरिष्ठ महाविद्यालये व विद्यापीठांमधील सहाय्यक प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१५) १०२१४ (०८-११-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात केंद्र व राज्य शासनाने आर्थिक कारण पुढे करून तासिका तत्वावर (सीएचबी) धोरण सुरू केले असून त्यातून उच्च शिक्षित मनुष्यबळ अतिशय कमी पैशात मिळत असल्याचे माहे मार्च, २०२१ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील १० वर्षे भरती प्रक्रियाच थांबविली असल्याने राज्यात लाखो सहाय्यक सहयोगी प्राध्यापक यांची पदे रिक्त असून सदरहू तासिका तत्वावरील (सीएचबी) प्राध्यपक कमी वेतनावर काम करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दहा वर्षात नेट परीक्षा उत्तीर्ण लाखो विद्यार्थी व पीएचडीधारक हजारो असून विद्यार्थी संख्या कोटीच्या पुढे गेली असून प्रत्येक वर्षी सेट-नेट उत्तीर्ण होणाऱ्यांची संख्या जास्त असल्यामुळे अनेक उच्च विद्या विभूषितांना वेठबिगाराची (वेटर, मॅनेजर, तसेच रस्त्यावर पुस्तके विकणे, गॅस वितरण करणे) अशी कामे करावी लागत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) महाविद्यालय व विद्यापीठात १०० टक्के प्राध्यापक भरती करावी, तासिका (सीएचबी) धोरण पूर्णत: बंद करावे, कायमस्वरूपी सेवेत समाविष्ट झाल्यानंतर सीएचबी अनुभव ग्राह्य धरण्यात यावा, जादा कार्यभारासाठी अर्धवेळ कायमस्वरूपी प्राध्यापक पदाची निर्मिती करावी, विनाअनुदानित महाविद्यालयांना १०० टक्के अनुदान द्यावे आदी प्रमुख मागण्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त मागण्यांच्या अनुषंगाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२४-१२-२०२२) :** (१) व (२) हे खरे नाही.

राज्यातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील तासिका तत्वावरील प्राध्यापकांच्या तात्पुरत्या नियुक्त्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार करण्यात येत असून याबाबत शासनाच्या दिनांक १४ नोव्हेंबर, २०१८ च्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येते.

राज्यातील अकृषी विद्यापीठांशी संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील मोठ्या प्रमाणावर रिक्त असलेल्या शिक्षकीय पदांपैकी सहाय्यक प्राध्यापकांची ४० टक्के म्हणजेच ३५८० पदे भरण्यास उच्च स्तरिय सचिव समितीने मान्यता दिलेली आहे. यानुसार दिनांक ०३/११/२०१८ चा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून त्यानुसार पदभरतीची प्रक्रीया सुरु होती. परंतु कोविड-१९ च्या पार्श्वभुमीवर पदभरतीवर निर्बंध जारी करण्यात आल्याने सदर पदभरतीची प्रक्रिया स्थगित करण्यात आली होती. तथापि, आता शासनाच्या दिनांक १२/११/२०२१ च्या आदेशानुसार सदरची भरती प्रक्रिया पुन:श्च सुरु करण्यात आलेली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) होय, हे खरे आहे.

(५) तासिका तत्वावरील अध्यापकांच्या मानधनामध्ये उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दिनांक १४/११/२०१८ च्या आदेशान्वये वाढ करण्यात आली होती. तथापि, त्यामध्ये शासनाच्या दिनांक २२/११/२०२१ च्या आदेशा अन्वये पुन:श्च वाढ करण्यात आलेली आहे.

तसेच यासंदर्भात शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दिनांक १०/०८/२०२१ च्या शासन निर्णयानुसार तासिका तत्वाच्या धोरणात सुधारणा करण्यासाठी संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली संबंधित लोकप्रतिनिधी व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटनांचे प्रतिनिधी यांचा समावेश असलेल्या समितीचे गठण करण्यात आलेले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मंगरुळ चव्हाळा (जि.अमरावती) येथील आदिवासी आश्रमशाळेच्या आवारातील विहिर बंद केल्याबाबत

**(१६) १०२६१ (०१-१०-२०२०) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर ते मुंबई द्रुतगती समृद्धी महामार्ग दिनांक १ मे, २०२१ रोजीपासून नागपूर ते शिर्डी पर्यंत सुरु होत असल्याने सदर महामार्गादरम्यान मंगरुळ चव्हाळा (जि.अमरावती) येथील आदिवासी आश्रमशाळेचा काही भाग व विहिर येत असून विहिर तोडण्याची परवानगी नसताना देखील कंत्राटदाराने रात्रीच्या वेळी विहिर बंद करण्याचा प्रयत्न केल्याची बाब माहे जानेवारी, २०२१ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विहिरी मधून चव्हाळा येथील आदिवासी आश्रमशाळेच्या मुलांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था होत असल्यामुळे सदर विहिर बंद केल्यास विद्यार्थी पिण्याच्या पाण्यापासून वंचित राहणार आहेत, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त शाळेतील विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करुन देण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१२-०१-२०२२) :** (१) अंशतः खरे आहे.

समृद्धी महामार्गाच्या रस्त्याच्या आखणीमध्ये सदर विहीत येत आहे. शासकीय जमीनीवरील सदर बांधकाम अनधिकृत आहे. समृध्दी महामार्गाचे होणार हे माहिती असतानाही या सरकारी जमीनीत बरोबर महामार्गाच्या आखणीमध्ये ५ वर्ग खोल्यांचे बांधकाम करण्यात आले. आदिवासी आश्रम शाळेच्या मदतीसाठी आखणीमध्ये कच्चे असलेले बांधकाम (वाचनालय), विहीर व ५ वर्ग खोल्यांचे बांधकाम इ. च्या पुर्नवसनासाठी आदिवासी फासेपारधी सुधार समिती, मंगरुळ चव्हाळा यांना तीन टप्प्यामध्ये (प्रत्येकी १७ लाख) एकूण ५१ लाख रुपये कच्चे असलेले बांधकाम (वाचनालय), विहीर व ५ वर्ग खोल्यांचे बांधकाम इ.च्या पुनर्वसनासाठी / स्थानांतरणासाठी देण्याचे ठरले. यामध्ये करार झाल्यानंतर यथावकाश रुपये १७ लाख असे NCC ltd. कडून देण्याचे ठरले. त्याबदल्यात शासकीय जमीन क्र.२५ मधील विहीर, कच्चे असलेले बांधकाम (वाचनालय) व ५ वर्ग खोल्यांचे बांधकाम इ.१५ मे, २०१९ पर्यंत काढून महामार्गाच्या १२० मीटर आखणीमधील जागा महामार्गाच्या बांधकामासाठी NCC Ltd ला मोकळी करुन देण्याचे करारात नमूद होते. त्यांना आतापर्यंत एकूण रुपये ३४ लक्ष देण्यात आले आहेत. तसेच, १६ एप्रिल, २०१९ रोजीच्या सामंजस्य कराराचे भंग होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर दिनांक ०४/०६/२०१९ व ०५/०६/२०१९ रोजी आदिवासी फासेपारधी सुधार समिती, मंगरुळ चव्हाळा यांचेकडून ५ खोल्या तोडण्यात आल्या.

समृध्दी महामार्गाच्या हद्दीतील ई-वर्ग गट क्र. २५ मधील अतिक्रमणीत विहीर बुजविण्याची कार्यवाही कंत्राटदाराकडून दिनांक ०५/०१/२०२१ रोजी सकाळी ६.०० वाजता महामार्ग बांधकामाचा भाग म्हणून करण्यात आली. परंतु जमावाने दगडफेक सुरु केल्याने विहीर बुजविण्याची कार्यवाही स्थगित करण्यात आली. तद्नंतर दिनांक २१/०१/२०२१ रोजी पोलीस बंदोबस्तात सदर अतिक्रमणीत विहीर बुजविण्यात आली आहे.

(२) खरे नाही.

सद्य:स्थितीत सदर शाळेला इतर दोन विहिरीवरुन पाणी पुरवठा करुन देण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शिक्षक भरतीमध्ये ५० टक्के कपात करण्यात आलेली मागासवर्गीयांची पदे भरण्याबाबत

**(१७) १०३५९ (२३-११-२०२१) श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिक्षक भरती कृती समितीच्या नेतृत्वाखाली आझाद मैदान, मुंबई येथे दिनांक ११ फेब्रुवारी, २०२० रोजी बेमुदत उपोषण सुरू करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यावेळी शिक्षक भरती कृती समिती शिष्टमंडळ आणि मा.ग्रामविकास मंत्री यांच्यात दिनांक १२ फेब्रुवारी, २०२० रोजी बैठक होऊन त्या बैठकीत मागासवर्गीयांची शिक्षक भरती प्रक्रिया आठ दिवसाच्या आत पूर्ण करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसून पन्नास टक्के कपात करण्यात आलेली पदे अद्यापही भरण्यात आली नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शिक्षक भरतीमध्ये ५० टक्के कपात करण्यात आलेली मागासवर्गीयांची पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२३-१२-२०२१) :** (१) होय.
(२) दिनांक १२/०२/२०२० च्या बैठकीत संबंधित जिल्हा परिषदांनी शिक्षकांच्या बिंदुनामावल्या तात्काळ विभागीय आयुक्त कार्यालयाच्या मागासवर्ग कक्षास सादर करून, त्या सात दिवसांच्या आत अद्ययावत करून त्याचा अहवाल शासनास सादर करण्याचे निदेश मा.ग्रामविकास मंत्री यांनी दिले होते.

(३) व (४) अंशत: खरे आहे.

ज्या जिल्ह्यात अनारक्षित पदे उपलब्ध आहेत, तेथे सर्व पदांवर भरतीस अनुमती देण्यात आली असून अनारक्षित पदे उपलब्ध नसल्यास ५०% पदे रिक्त ठेवण्याबाबत कळविण्यात आले आहे. बिंदूनामावल्या अद्यायावत झाल्यानंतर सर्व पदांवर भरतीस अनुमती देण्याची तजवीज ठेवली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## प्रादेशिक मनोरुग्णालय येरवडा येथील अधीक्षक यांच्यावर कारवाई करण्याबाबत

**(१८) ११११२४ (०२-१२-२०२१) श्री.सुरेश धस :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येरवडा (जि.पुणे) येथील प्रादेशिक मनोरुग्णालयामधील वैद्यकीय अधीक्षक या पदासाठी नियमानुसार मनोविकारतज्ञ या विषयात पोस्टग्रॅज्युएटची अट असताना बालरोगतज्ञ या विषयात पोस्टग्रॅज्युएट असलेल्या डॉ.अभिजित फडणीस यांना नियमबाह्य पध्दतीने सन २०१८ मध्ये वैद्यकीय अधीक्षक या पदावर पदस्थापना दिली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रादेशिक मनोरुग्णालय येरवडा, पुणे येथील वैद्यकीय अधीक्षक यांनी वित्तीय तरतुदींचा संदर्भ घेऊन आर्थिक व्यवहाराचे प्राधिकार बदलून रुग्णालयातील स्वच्छता कंत्राटी देयके व आरकेएसची इतर देयके अटी शर्थीची पूर्तता न करता नियमबाह्य पध्दतीने अदा केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामीण रुग्णालय, निमगाव केतकी येथे कार्यरत असताना डॉ.अभिजित फडणीस यांना सन २०१५ मध्ये ॲट्रासिटी कायद्यांतर्गत दाखल गुन्ह्यात झालेल्या अटकेबाबत त्यांनी शासनास कळविले होते काय, अटक कालावधीतील वेतन त्यांना अदा झाले आहे काय, तसेच, अटक कालावधीमुळे त्यांच्या शासन सेवेत पडलेला खंड शासनाच्या परवानगीने समाप्त केला होता काय,

(४) असल्यास, प्रादेशिक मनोरुग्णालय येरवडा, पुणे येथील वैद्यकीय अधीक्षक व उपअधीक्षक यांच्या मनमानी व दहशतीच्या कारभारामुळे अनेक अधिकारी व कर्मचारी मानसिक व शारीरिक त्रासाला बळी पडत असून उपअधीक्षक यांच्या दालनात वर्ग-४ च्या कर्मचाऱ्याने स्वतःची नस कापून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला असून सदर कर्मचाऱ्यावर दबाव आणून तक्रार करण्यापासून परावृत्त केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने नियमबाहय पध्दतीने काम करणाऱ्या प्रादेशिक मनोरुग्णालय येरवडा, पुणे येथील वैद्यकीय अधीक्षक व उपअधीक्षक यांच्यावर कारवाई करुन त्यांच्या बदलीबाबत तसेच वैद्यकीय अधीक्षक, प्रादेशिक मनोरुग्णालय येरवडा, पुणे यांच्या नियुक्तीचे आदेश काढणाऱ्या संबंधित इतर दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१७-१२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे, वैद्यकीय अधीक्षक हे पद जिल्हा शल्य चिकित्सक या संवर्गातील असून, सेवा प्रवेश नियमानुसार प्रादेशिक मनोरुग्णालयातील वैद्यकीय अधीक्षक या पदावर मनोविकृतीतज्ञ या विषयातील तज्ञाची नियुक्ती केली जाते. परंतु, सेवाजेष्ठतेनुसार मनोविकृती तज्ञांची संख्या कमी असल्यामुळे जिल्हा शल्यचिकित्सक संवर्गातील अधिकाऱ्याची वैद्यकीय अधीक्षक म्हणून प्रादेशिक मनोरुग्णालय, पुणे येथे पदस्थापना करण्यात आलेली आहे.

(२) या संदर्भांत चौकशी करण्याचे आदेश सहायक संचालक, लेखा व लेखापरीक्षा, पुणे यांना देण्यात आलेले आहेत.

(३) डॉ. अभिजित फडणीस, तत्कालीन वैद्यकीय अधीक्षक यांना ॲट्रॉसिटी कायद्याअंतर्गत गुन्हा नोंद होवून, दिनांक १५/१२/२०१५ रोजी अटक झाली होती. या प्रकरणात मा.सत्र न्यायालय बारामती यांनी विशेष सत्र प्रकरण क्र.७३/२०१६ मध्ये दिनांक २१/०१/२०१९ रोजी त्यांची निर्दोष मुक्तता केलेली असून, याबाबत दिनांक ०६/०१/२०२० रोजी शासनास कळविण्यात आलेले आहे.

डॉ.अभिजित फडणीस यांना अटक झालेल्या कालावधीत जे वेतन अदा करण्यात आलेले आहे ते वसूल करणेबाबत संबंधितांना कळविण्यात आलेले आहे. तसेच ग्रामीण रुग्णालय, निमगांव केतकी, जि.पुणे येथील तत्कालीन प्रभारी वैद्यकीय अधीक्षक यांच्याविरोधात शिस्तभंगाची कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

डॉ.अभिजित फडणीस यांच्या सेवेतील, दिनांक ०५/११/२०१५ ते दिनांक २३/१२/२०१५ या कालावधीचा सेवा खंड शासन स्तरावरुन क्षमापित करण्यात आलेला नाही.

(४) अंशत: खरे आहे, या प्रकरणी चौकशी समितीने दिलेल्या अहवालानुसार संबंधित वर्ग-४ चे कर्मचारी श्री.नानासाहेब ज्ञानदेव शिंदे यांना उपअधीक्षक यांनी कार्यालयात मास्क का घातला नाही अशी विचारणा केली असता श्री.शिंदे हे घरातील आर्थिक अडचणी व प्रचंड मानसिक दबावाखाली असल्यामुळे त्यांनी रागाच्या भरात स्वत:स जखम करुन घेतल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच याबाबत उपअधीक्षक यांच्याविरुध्द त्यांनी काहीही तक्रार नाही असे चौकशी समितीसमोर नमूद केले आहे.

(५) उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे यांच्याकडून संबंधित वैद्यकीय अधीक्षक व वैद्यकीय उपअधीक्षक यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाईचा प्रस्ताव आरोग्य सेवा आयुक्तालयास प्राप्त झालेला असून, सदर प्रस्ताव आयुक्तालयाकडुन शासनास प्राप्त झाल्यानंतर त्यावर नियमानुसार आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मोखाडा व विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये प्लॅस्टीक सदृश तांदूळ वाटप करण्यात आल्याबाबत

**(१९) ११५५३ (२५-११-२०२१) श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोखाडा व विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यातील खोडाळा, वाकडपाडा, मोरद्याचापाडा व चाबके तलावली परिसरातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहारामध्ये प्लॅस्टीक सदृश तांदूळ वाटप

करण्यात आल्याची बाब दिनांक ८ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोन्ही पंचायत समित्यांचे गटविकास अधिकारी तसेच जिल्हा व तालुका धान्य पुरवठा अधिकारी यांचेकडे जिल्हा परिषद व पंचायत समित्यांचे पदाधिकारी, ग्रामस्थ व राजकीय पक्षांचे कार्यकर्ते यांनी दिनांक ९ जुलै, २०२१ रोजी तक्रार करुन कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पोषण आहारामध्ये वाटप करण्यात आलेले प्लॅस्टीक सदृश तांदूळाचे नमुने तपासणीसाठी लॅबमध्ये पाठविण्यात आले असून त्याचा अहवाल प्राप्त होताच संबंधित पुरवठा अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्लॅस्टीक सदृश तांदूळाचे नमुने तपासणीसाठी लॅब मध्ये केव्हा पाठविण्यात आले व त्याचा अहवाल कधी प्राप्त झाला आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने संबंधित पुरवठा अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२०-१२-२०२१) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाकडून शैक्षणिक वर्ष सन २०२१-२२ पासून योजनेंतर्गत फोर्टिफाईड तांदूळ प्रथमच पुरवठा केला जात आहे. विद्यार्थ्यांच्या आहारामधील सुक्ष्म पोषकतत्वांची कमतरता भरुन काढण्याकरीता फोर्टिफाईड तांदूळ देण्यात येत आहे. तांदूळामध्ये Iron, Folic Acid, Vitamin B१२ तसेच Zinc Vitamin A, Vitamin B१, B२, B५, B६ या पोषक घटकांचा (Micronutents) समावेश करुन फोर्टिफाईड तांदूळ बनविण्यात आलेला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना अधिकची पोषकतत्वे मिळण्याच्या दृष्टीने सदर तांदूळ अत्यंत उपयुक्त आहे. पुरवठा करण्यात येणाऱ्या तांदूळामध्ये फोर्टिफाईड तांदूळ व नियमित तांदूळ यांचे प्रमाण १:१०० आहे. म्हणजेच पुरवठा करण्यात आलेल्या तांदूळामध्ये फोर्टिफाईड तांदूळाचे प्रमाण १ किलोमध्ये १० ग्रॅम याप्रमाणे आहे.

प्रक्रिया करण्यात आलेल्या फोर्टिफाईड तांदूळ पिवळसर रंगाचा व नियमित तांदूळापेक्षा कमी असल्याने पाण्यामध्ये वर तरंगतांना दिसून येतो. त्यामुळे समाजात सदर तांदूळ प्लॉस्टिकचा असल्याबाबतचा गैरसमज पसरत आहे. याबाबतचे स्पष्टीकरण प्राथमिक शिक्षण संचालनालयाने परिपत्रकाव्दारे दिले आहे.

(३) होय, हे खरे आहे.

सदर तांदूळ हा फोर्टिफाईड तांदूळ आहे.

(४) शिक्षणाधिकारी (प्राथ.), यांनी दिनांक ११ जुलै, २०२१ रोजी नमुने भारतीय अन्न महामंडळाकडे पाठविले होते. त्यानुसार भारतीय अन्न महामंडळाने दिनांक १२ जुलै, २०२१ रोजीच्या पत्रान्व्ये सदर तांदुळ फोर्टिफाईड असल्याचे कळविले आहे. तसेच, सदर तांदुळ भारतीय अन्न महामंडळाने NCML LABS यांच्याकडून तपासून घेवून त्यामधील पौष्टीक घटकाबाबतचा माहिती अहवाल दिनांक १० नोव्हेंबर, २०२१ रोजी सादर केला आहे.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील शाळा व तुकड्यांच्या गैरव्यवहाराबाबत

**(२०) ४६०४६ (०५-१२-२०१८) श्री.बाळाराम पाटील : दिनांक २२ नोव्हेंबर, २०१८ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २ मधील प्रश्न क्रमांक ४३८३० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील २०० कोटी रूपयांच्या १०२४ शाळा व तुकड्यांच्या गैरव्यवहाराविरूध्द शासनाने दिनांक २० ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास चौकशीचे आदेश देवूनही चौकशी झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत मा.मुख्यमंत्र्यांना मुंबई शिक्षक लोकशाही आघाडी संघटनेने दिनांक २० जानेवारी, २०१६, दिनांक २९ फेब्रुवारी, २०१६, दिनांक २४ मे, २०१७, दिनांक १४ नोव्हेंबर, २०१७ व दिनांक ९ मे, २०१८ रोजी निवेदन देवून तक्रार केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित गैरव्यवहारातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१४-०२-२०२२) :** (१) व (२) सदर प्रकरणी मुंबई शिक्षक लोकशाही आघाडीने तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांना निवेदन दिले होते. सदर प्रकरणी सखोल चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत.
(३) व (४) चौकशी अहवाल अप्राप्त आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.